महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित**
(CIN No. U40109MH2005SGC153646)
**मानव संसाधन विभाग**

फोन नं.(०२२) २६५९८५९५/ २६५९५०००
फॅक्स (०२२) २६५९८५८७/२६५९२००१
Email - cgmhr@mahatransco.in
Website - www.mahatransco.in

प्रकाशगंगा प्लॉट नं. सी- १९
इ-ब्लॉक, ७वा मजला, वांद्रे-कुर्ला-संकुल,
बांद्रा (पूर्व),मुंबई-४०००५१.

क्र.मराविपाकंम/मासं-समन्वय/ऑनलाईन अर्ज-पीजीपो/आसपो/परि/ No 07040 दिनांक:- २३.०९.२०१९

# परिपत्रक - मासं क्र.६८

**विषय :** पी.जी.पोर्टल व आपले सरकार पोर्टलद्वारे प्राप्त होणारी निवेदने / तक्रारींवर तात्काळ कार्यवाही करणेबाबत.

**वाचा :** १) कार्यालयीन आदेश क्र.९१, जा.क्र.३९४३ दिनांक २४.०५.२०१९
२) कार्यालयीन आदेश क्र. १३३, जा.क्र. ५८०२ दिनांक ०१.०८.२०१९

## अ) पी.जी.पोर्टल :

केंद्र शासनाकडून पी.जी.पोर्टल या संगणक प्रणालीद्वारे महाराष्ट्र शासनाच्या ऊर्जा विभागाशी संबंधीत असलेल्या तक्रारी महाराष्ट्र शासनाकडून महापारेषण कंपनीकडे प्राप्त होत असतात.

२. पी.जी.पोर्टल संगणक प्रणालीद्वारे केंद्र शासनाला प्राप्त झालेली निवेदने/तक्रारी या वरील प्रणालीद्वारे महाराष्ट्र शासनाकडे हस्तांतरीत होत असतात. तद्नंतर सदर निवेदने/तक्रारी महाराष्ट्र शासनाच्या ऊर्जा विभागामार्फत महापारेषण कंपनीकडे वर्ग करण्यात येतात. तद्नंतर सदर निवेदने/तक्रारींचे स्वरुप विचारात घेऊन कंपनी अंतर्गत असलेल्या संबंधीत विभागप्रमुखांना पाठविण्यात येऊन त्यांचेवर तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

<u>पी.जी.पोर्टलची कार्यपद्धती</u> :

१) कार्यालयीन आदेश क्र.९१, जा.क्र.३९४३ दिनांक २४.०५.२०१९ अन्वये मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी मुख्य महाव्यवस्थापक (मासं) यांना समन्वयक अधिकारी (नोडल ऑफिसर) म्हणून निवड केली आहे. तर समन्वयक अधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारींवर कार्यवाही करण्याकरीता श्री. तेजस टिकले, उप कार्यकारी अभियंता (पा) हे "तांत्रिक समन्वयक" (भ्रमणध्वनी क्र.९५९४९९३९८१ व ई-मेल आयडी dyeedms@mahatransco.in) म्हणून कामकाज पहात आहेत.

२) पी.जी.पोर्टलद्वारे प्राप्त झालेली निवेदने / तक्रारींवर केलेल्या कार्यवाहीची माहिती संबंधीत विभागप्रमुखांनी पोर्टलवर टाकणे व अर्जदाराला / तक्रारदाराला संगणक प्रणालीद्वारे कळविणे इ. संदर्भात समन्वय साधून समन्वयक अधिकारी (नोडल ऑफिसर) त्याचा पाठपुरावा करतील.

३) सदर प्रणालीच्या अधिक माहितीसाठी https://pgportal.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## ब) आपले सरकार पोर्टल :

महाराष्ट्र राज्यात पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता आणि तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम क्र.३१, दिनांक १९ ऑगस्ट २०१५ अन्वये सर्वसमावेशक कायदा करण्यात आला आहे.

२. राज्य शासनाकडे आपले सरकार या संगणक प्रणालीद्वारे महाराष्ट्र राज्याशी संबंधीत तक्रारी प्राप्त होत असतात. त्यातील ज्या तक्रारी महापारेषण कंपनीशी संबंधीत असतात त्या ऊर्जा विभागाकडून महापारेषण कंपनीकडे प्राप्त होत असतात.

<u>आपले सरकार पोर्टलची कार्यपद्धती</u> :

१) कार्यालयीन आदेश क्र. १३३, जा.क्र. ५८०२ दिनांक ०१.०८.२०१९ अन्वये मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी कार्यकारी संचालक (मासं) यांची समन्वयक अधिकारी (नोडल ऑफिसर) म्हणून निवड केली आहे. तर समन्वयक अधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारींवर कार्यवाही करण्याकरीता श्री. कुंदनसिंह ठाकोर, अतिरिक्त कार्यकारी अभियंता (पा) हे "तांत्रिक सहाय्यक" (भ्रमणध्वनी क्र.८०९७०४५११२ व ई-मेल आयडी dyee4prj@mahatransco.in) म्हणून कामकाज पहात आहेत.

२) आपले सरकार पोर्टलद्वारे प्राप्त झालेली निवेदने/तक्रारींवर केलेल्या कार्यवाहीची माहिती संबंधीत विभागप्रमुखांनी पोर्टलवर टाकणे व अर्जदाराला/तक्रारदाराला संगणक प्रणालीद्वारे कळविणे इ. संदर्भात समन्वय साधून समन्वयक अधिकारी (नोडल ऑफिसर) त्याचा पाठपुरावा करतील.

३) सदर प्रणालीच्या अधिक माहितीसाठी https://aaplesarkar.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**<u>नियत कालमर्यादा :</u>**

पी.जी.पोर्टल व आपले सरकार पोर्टल या संगणक प्रणालीद्वारे प्राप्त झालेली निवेदने / तक्रारींवर प्राधान्याने अनुक्रमे ३० व २१ दिवसांच्या आत उत्तर देणे बंधनकारक आहे. तद्अनुषंगाने आपल्या परिमंडळांतर्गत प्राप्त झालेल्या तक्रारींवर तात्काळ कार्यवाही करुन प्रकरणे प्रलंबित राहणार नाहीत व त्यांची उत्तरे तत्परतेने दिली जातील, याची योग्य ती दक्षता घेण्यात यावी.

सबब, सर्व विभागप्रमुख / संबंधीत अधिकारी यांना कळविण्यात येते की, यापुढे पी.जी.पोर्टल व आपले सरकार पोर्टल या संगणक प्रणालींवर प्राप्त होणारे निवेदने / तक्ररींची माहिती ऑनलाईन पद्धतीने देणे बंधनकारक आहे.

प्रस्तूत परिपत्रक www.ep.mahatransco.in या कंपनीच्या सिंहद्वारावर (Employee Portal) उपलब्ध करण्यात आलेले आहे. तरी परिपत्रकाची प्रत प्रेषण यादीप्रमाणे पोस्टाने पाठविली जाणार नाही.

23/08/2018

**(सुगत गमरे)**
**कार्यकारी संचालक (मासं)/(प्रभारी)**

सहपत्र : वरीलप्रमाणे.

प्रत :
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे.

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
मानव संसाधन विभाग
(CIN No. U40109MH2005SGC153646)
फोन नं.(०२२) २६५९८५९५/ २६५९५०००
फॅक्स (०२२) २६५९८५८७/२६५९२००१
प्रकाशगंगा प्लॉट नं. सी- १९
इ-ब्लॉक, ७वा मजला, बांद्रा-कुर्ला-कॉम्प्लेक्स,
बांद्रा (पूर्व),मुंबई-४०००५१.

क्र. मराविपाकंम/सांका/मासं/समन्वय/पीजीपो/ 3983

दिनांक : 28.05.2019

## कार्यालयीन आदेश - 09

राज्य शासनाकडे पी.जी. पोर्टल या संगणक प्रणालीद्वारे केंद्र शासनाकडून महाराष्ट्र राज्याशी संबंधित तक्रारी प्राप्त होत असतात. त्यातील ज्या तक्रारी महापारेषण कंपनीशी संबंधीत असतात त्या महापारेषण कंपनीकडे प्राप्त होत असतात. अश्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर त्या संबंधीत विभागाकडे पाठविणे, संबंधीत विभागाने त्या तक्रारींवर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्या पोर्टलवर टाकणे, तसे अर्जदाराला/ तक्रारदाराला ऑनलाईन /पत्राद्वारे कळविणे वेगैरे बाबींवर समन्वय साधून त्याचा पाठपुरावा करणे गरजेचे आहे. त्यासाठी एक समन्वय अधिकारी नेमणे गरजेचे आहे.

२. तद्अनुषंगाने, मा. अवर सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दि. ०८.०४.२०१९ व दि. ०२.०५.२०१९ रोजीच्या पत्रास अनुसरुन मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी दिलेल्या निर्देशानुसार मुख्य महाव्यवस्थापक (मासं) हे पी.जी.पोर्टल या संगणक प्रणालीवर कंपनीशी संबंधीत प्राप्त झालेल्या तक्रारींवर कार्यवाही करण्याकरीता कंपनीच्या वतीने काम पाहतील व श्री. तेजस टिकले, उप कार्यकारी अभियंता (पा) हे "तांत्रिक समन्वयक" म्हणून कामकाज पाहतील.

३. तरी, सर्व विभाग प्रमुख यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी या बाबीची नोंद घ्यावी व त्यांच्या विभागाशी संबंधीत तक्रारींवर श्री. तेजस टिकले यांचेशी समन्वय ठेवून कार्यवाही करावी. प्राप्त तक्रारींवर त्वरीत व अचूक उत्तर विनाविलंब दिले जाईल याची सर्व विभाग प्रमुखांनी खबरदारी घ्यावी.

28/05/2019

(सुगत गमरे)
**कार्यकारी संचालक (मासं)/(प्रभारी)**

**प्रत सविनय सादर:**

१. मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण, सांघिक कार्यालय, मुंबई.
२. संचालक (संचालन)/(प्रकल्प)/(वित्त), महापारेषण, सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत रवाना:**

१. सर्व विभाग प्रमुख, महापारेषण.
२. महाव्यवस्थापक (मनि)/(आस्था)/(विवले), महापारेषण, सांघिक कार्यालय, मुंबई.
३. मुख्य विधी अधिकारी, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, सांघिक कार्यालय, मुंबई.
४. सर्व अधिक्षक अभियंता, महापारेषण, सांघिक कार्यालय, मुंबई.

महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित**
(CIN No. U40109MH2005SGC153646 )
मानव संसाधन विभाग
फोन नं. (०२२) २६५९५००० (विस्तारीत क्र.५२१०)
फॅक्स (०२२) २६५९१७२८
E-mail: cgmhr@mahatransco.in
Website: www.mahatransco.in
प्रकाशगंगा प्लॉट नं. सी - १९, ई-ब्लॉक, ७ वा मजला,
बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१

क्र. मराविपाकंम/महा(आस्था)/शासन संदर्भ/आपले सरकार/पदनिर्देशन/No 05802 दिनांक : 1 AUG 2019

## कार्यालयीन आदेश 933

राज्य शासनाकडे आपले सरकार पोर्टल या संगणक प्रणालीद्वारे तक्रारी प्राप्त होत असतात. त्यातील ज्या तक्रारी महापारेषण कंपनीशी संबंधित असतात त्या महापारेषण कंपनीकडे प्राप्त होत असतात. अशा तक्रारी प्राप्त झाल्यानंतर त्या संबंधित विभागाकडे पाठविणे, संबंधित विभागाने त्या तक्रारींवर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्या पोर्टलवर टाकणे, तसे अर्जदाराला/तक्रारदाराला ऑनलाईन/पत्राद्वारे कळविणे इ. बाबींवर समन्वय साधून त्याचा पाठपुरावा करणे गरजेचे आहे.

२. याविषयी उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई या विभागाच्या दि. २९.०६.२०१९ व दि. २०.०७.२०१९ रोजीच्या पत्रान्वये मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी दिलेल्या निर्देशानुसार आपले सरकार पोर्टल या संगणक प्रणालीवर कामकाज पाहण्याकरीता पुढील तक्त्यातील अधिका-यांची नेमणूक करण्यात येत आहे -

| अधिका-याचे नांव | पदनाम | भ्रमणध्वनी क्रमांक | ईमेल-आयडी |
|---|---|---|---|
| श्री. सुगत शंकर गमरे | कार्यकारी संचालक (मासं) (प्रभारी) | ०९१६७८८९८७८ | edhr@mahatransco.in |

३. तसेच याबाबत श्री. कुंदनसिंह सुरेंद्रसिंह ठाकोर, अतिरिक्त कार्यकारी अभियंता हे तांत्रिक सहाय्यक म्हणून काम पाहतील. त्यांच्या भ्रमणध्वनी क्र. ८०९७०४५११२ व ईमेल आयडी dyee4prj@mahatransco.in आहे.

४. तरी, सर्व विभागप्रमुखांना विनंती करण्यात येते की, त्यांनी याबाबतची नोंद घ्यावी व त्यांच्या विभागाशी निगडीत असलेल्या तक्रारींवर तांत्रिक सहाय्यक यांच्याशी समन्वय साधून विनाविलंब उत्तर पाठविण्याची कार्यवाही करावी.

01/08/2019

(सुगत गमरे)
कार्यकारी संचालक (मासं) (प्रभारी)

**प्रत सविनय सादर -**

१. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, मराविपाकंम, सांघिक कार्यालय, मुंबई
२. संचालक (संचलन)/(प्रकल्प)/(वित्त), मराविपाकंम, सांघिक कार्यालय, मुंबई

**प्रत रवाना -**

सर्व विभागप्रमुख सांघिक कार्यालय तसेच क्षेत्रीय कार्यालये